# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### अहमदनगर जिल्हयात वाळू तस्करांची वाहने ताब्यात घेवून केलेली कारवाई

**(१) ३४४६२ (२३-१२-२०१५). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयात दिनांक १ मे, २०१५ ते ३१ सप्टेंबर, २०१५ अखेर जिल्हा गौण खनिज विभागातर्फे किंती वाळू तस्करांची वाहने ताब्यात घेवून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे,

(२) असल्यास, आतापर्यंत त्यांच्याकडून किती किंमतीची वाळू जप्त करण्यात आली आहे,

(३) असल्यास, जप्त केलेली वाळूची विल्हेवाट कशाप्रकारे लावण्यात आली आहे,

(४) असल्यास, या जप्त केलेल्या वाळूपासून शासनाला किती उत्पन्न मिळाले आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-१०-२०१६) :** (१) अहमदनगर जिल्हयात दि. १ मे, २०१५ ते दि.३० सप्टेंबर, २०१५ या कालावधीत वाळूच्या अवैध वाहतूकीची एकूण ४२० वाहने पकडून त्यांच्याकडून रुपये १,६६,८२,२८०/- इतकी दंडाची रक्कम वसूल करण्यात आली आहे.

(२), (३) व (४) उक्त कालावधीत एकूण ३०१.३६ ब्रास वाळू जप्त करण्यात येवून, त्यापैकी २००.८६ ब्रास वाळूचा लिलाव झाला असून, लिलावापासून रु.९,१३,२९०/- इतकी रक्कम प्राप्त झाली आहे. उर्वरित १००.५ ब्रास वाळूच्या लिलावाची कार्यवाही सुरु आहे.

---

## मिरज तालुक्याचे (जि.सांगली) विभाजन करुन नवीन तालुका निर्माण करणेबाबत

**(२) ३५३०१ (२३-१२-२०१५). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयातील मिरज तालुक्याचे विभाजन होऊन नवीन सांगली तालुका निर्माण करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने यासंदर्भात एक उच्च स्तरीय समिती गठीत केली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या समितीच्या शिफारशी काय आहेत,

(४) असल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१९-१०-२०१६) :** (१), (२), (३), व (४) होय, तालुका विभाजनाच्या अनुषंगाने निकष निश्चित करण्याबाबत विभागीय आयुक्त, कोकण यांच्या अध्यक्षतेखाली शासनाकडून गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झालेला आहे. प्राप्त अहवालातील शिफारशीच्या अनुषंगाने सर्व विभागीय आयुक्तांकडून मागविण्यात आलेले अभिप्राय प्राप्त झाले असून तालुका विभाजनाचे निकष निश्चित करण्याबाबत धोरण ठरविण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर धोरण निश्चित झाल्यानंतर प्रकरणपरत्वे नवीन तालुका निर्मितीबाबत उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.

---

## सोलापूर जिल्हयामध्ये ऑनलाईन ७/१२ उता-यातील त्रुटी व चुकांबाबत

**(३) ३५४०१ (२३-१२-२०१५). श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयामध्ये जिल्हा प्रशासनाकडून ऑगस्ट महिन्यापासून हस्तलिखित उतारे देणे बंद करून ऑनलाईन उतारे देण्याचे काम सुरू केल्याने मिळणा-या ७/१२ व इतर उता-यामध्ये त्रुटी व चुका असल्यामुळे नागरिकांना व्यवहार करताना मोठ्या प्रमाणावर अडचणी येत असल्याचे माहे ऑक्टोबर,२०१५ मध्ये निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या दोन महिन्यांपासून खरेदी विक्री व्यवहार बंद असल्यामुळे शासनाचा लाखो रूपयाचा महसूल बुडत असल्याने याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार ऑनलाईन सुविधा सुरळीत होईपर्यंत पूर्वीप्रमाणेच हस्तलिखित उतारे देणेबाबत शासनाकडून काय कार्यवाही केली, आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-१०-२०१६) :** (१) सोलापूर जिल्ह्यातील संगणकीकृत गा.न.नं. ७/१२ उताऱ्यात त्रुटी आढळल्यास त्यांचे निवारण करण्यासाठी जमाबंदी आयुक्त पुणे, जिल्हा सूचना विज्ञान केंद्र, पुणे तसेच जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी, सोलापूर यांच्या मार्गदर्शनानुसार उपयुक्त आज्ञावलीचा वापर करुन तांत्रिक अडचणी दूर करण्यात आलेल्या असून नागरीकांना संगणकीकृत गा.न.नं. ७/१२ उतारे उपलब्ध होत आहेत.
(२), (३), व (४) प्रश्न उद्भवत नाही

---

**सांगली जिल्हयातील तालुक्यांच्या विभाजनाचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्याबाबत**

**(४) ३५६५४ (२३-१२-२०१५). श्री.विलासराव जगताप (जत) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्ह्याच्या एकूण क्षेत्रफळाच्या साधारण १/३ क्षेत्रफळ, १२३ गावे ८ मंडळ कार्यालय असणाऱ्या तालुक्याच्या विभाजनाचा प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबित आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास तालुक्याचे विभाजन केव्हा होणार,
(३) असल्यास तालुकावाईज निधीवाटप करताना जत तालुक्यावर अन्याय होणार नाही याबाबत शासन काय कार्यवाही करणार आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१९-१०-२०१६):** (१),(२),(३), व (४) होय, तालुका विभाजनाच्या अनुषंगाने निकष निश्चित करण्याबाबत विभागीय आयुक्त, कोकण यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झालेला आहे. प्राप्त अहवालातील शिफारशीच्या अनुषंगाने सर्व विभागीय आयुक्तांकडून मागविण्यात आलेले अभिप्राय प्राप्त झाले असून तालुका विभाजनाचे निकष निश्चित करण्याबाबत धोरण ठरविण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर धोरण निश्चित झाल्यानंतर प्रकरणपरत्वे नवीन तालुका निर्मितीबाबत उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.

---

**कोकणातील विटा व कौल उत्पादकांच्या विविध मागण्यांच्या पूर्तताबाबत**

**(५) ३९३४३ (१३-०१-२०१६). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकणातील विटा व कौल उत्पादकांची मातीवरील रॉयल्टी रद्द करण्याची, तसेच गावतळी धरणे यांतील गाळ काढण्यासाठी टाकण्यात आलेली परवानगीची अट शिथील करण्याची मागणी शासनाकडे माहे नोव्हेंबर, २०१५ च्या तिसऱ्या आठवड्यात केली असल्याचे निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू केलेल्या मागण्याची पुर्तता करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील (२०-१०-२०१६) :** (१) अशी आशयाची मागणी करण्यात आल्याचे निदर्शनास आले नाही.
(२), (३), व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पालघर जिल्ह्यातील विकास कामांसंदर्भातील आढावा बैठकीबाबत**

**(६) ३९३९४ (२१-१-२०१६). श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवनिर्मित पालघर जिल्ह्याच्या विविध विषयांचा आढावा घेण्यासाठी ठाणे आणि पालघर जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींसमवेत दिनांक १८ नोव्हेंबर, २०१५ रोजी मंत्रालयामध्ये मा. मुख्यमंत्र्यांनी विशेष बैठक आयोजित केलेली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त बैठकीमध्ये पालघर जिल्ह्यातील विकास कामांसंदर्भात तसेच विविध विभागांतील ४७ महत्वाची कार्यालये कार्यान्वित करण्याबाबत मा. मुख्यमंत्र्यांनी कोणते निर्देश प्रशासनाला दिले आहेत,
(३) असल्यास, मा. मुख्यमंत्र्यांच्या निर्देशानुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१९-१०-२०१६) :** (१), (२) व (३) विविध संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांचे आस्थापना ठाणे व पालघर जिल्ह्यामध्ये विभाजनासाठी सामान्य प्रशासन विभागाने एकच धोरण निश्चित करणे, स्थापन न झालेल्या ४७ कार्यालयांचा प्राधान्यक्रम ठरवून पुढील २ महिन्यात ती कार्यान्वित करणे, पदांची निर्मिती करणे, पद भरती प्रक्रिया पूर्ण करणे, पदभरती नंतर जे अधिकारी/कर्मचारी पालघर येथे हजर होणार नाही, त्यांच्यावर प्रशासकीय कार्यवाही करणे, नवीन पालघर टाऊनशिप विकसित करणे, कोकण विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी, पालघर यांनी सदर कामावर नियंत्रण ठेवावे असे निर्देश मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक १८.११.२०१५ रोजी झालेल्या बैठकीत दिले आहेत. त्यानुसार खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे :-

अ. शासन निर्णय, ग्राम विकास विभाग दिनांक २९ फेब्रुवारी, २०१६ अन्वये ठाणे जिल्ह्याच्या विभाजनानंतर विकल्पानुसार कर्मचाऱ्यांचे समायोजन करण्यासाठी मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत.

ब. पालघर येथे स्थापन व्हावयाच्या ४७ कार्यालयांपैकी ११ कार्यालये स्थापन करण्यात आली आहेत. सिडको लिमिटेड, नवी मुंबई मार्फत पालघर परिसरातील शासकीय जमिनीवर

पालघर जिल्ह्याचे मुख्यालय विकसित करणे व "पालघर नवनगर" विकसित करण्याबाबतचा निर्णय दिनांक २९ जून, २०१६ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. त्याअंतर्गत नवीन जिल्हा मुख्यालयाचे काम प्राधान्याने ३ वर्षात पूर्ण करण्याचेही आदेशित करण्यात आले आहे.
क. उर्वरित कार्यालये स्थापन करण्याच्या दृष्टीने संबंधित विभागांच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

---

**वसईच्या पूर्व भागातील खाडीत बंदी असतानाही मोठ्या प्रमाणात रेती उत्खन्न होत असल्याबाबत**

**(७) ४२१८३ (२०-०४-२०१६). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसईच्या पूर्व भागातील खाडीत बंदी असतानाही मोठ्या प्रमाणात रेती उत्खन्न होत असल्याचे माहे जानेवारी २०१६ च्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथील नायब तहसीलदार यांनी गेल्या नऊ महिन्यांत सुमारे ११ कोटी रुपयांची दंडाची वसुली केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात मोठया प्रमाणात अवैध रेती उत्खन्न होत आहे त्यामुळे शासनाने अवैध उत्खननास पूर्णपणे बंदी करण्याबाबत शासनाने ठोस धोरण आखण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-१०-२०१६) :** (१) महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांनी वसई तालुक्यात वैतरणा नदी व खाडीपात्रात नौकानयन मार्ग सुकर करण्यासाठी निश्चित करुन दिलेल्या ठिकाणी रेती उत्खननासाठी जानेवारी, २०१६ पर्यंत १९ परवाने देण्यात आले असून, त्यांच्यामार्फत उत्खनन सुरु आहे.
(२) वसई तालुक्यातील मौजे खानिवडे, शिरगांव, खार्डी, काशिदकोपर व चिखलडोंगरे येथे महसुल विभाग, परिवहन विभाग व पोलीस विभागामार्फत दि.३०/६/२०१५ व दिनांक २१/१२/२०१५ रोजी केलेल्या तपासणीत जप्त केलेला ५,३३२ ब्रास रेती साठा व यापूर्वी जप्त केलेला रेतीसाठी असा एकूण १७,८१८ ब्रास रेतीसाठ्याचा लिलाव करुन रु.१०,८०,७२,४००/- एवढी रक्कम शासनास प्राप्त झाली आहे.
(३) गौण खनिजाच्या अवैध उत्खनन वाहतुकीस आळा घालण्यासाठी राज्यात जिल्हा स्तरावर तसेच तालुका स्तरावर दक्षता पथके गठीत करणे, अवैध उत्खनन/ वाहतूकीच्या प्रकरणात गौण खनिजाच्या बाजारभावाच्या ५ पट दंड आकारणे, उत्खनन व वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली यंत्रसामग्री व वाहने जप्त करणे, प्रकरणपरत्वे वाळू तस्करांविरुध्द एम.पी.डी.ए अधिनियमांतर्गत कारवाई करणे, जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पोलीस आयुक्त / पोलीस अधीक्षक, प्रादकशिक परिवहन अधिकारी यांची समिती स्थापन करणे इत्यादी उपययोजना करण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नेरळ परिसरात उल्हास नदीतील तलवडे पुलाजवळील नदीपात्रात अनेक दिवसापासून बेकायदेशीरपणे मोठ्या प्रमाणात रेती उत्खनन होत असल्याबाबत**

**(८) ४३२६४ (२०-०४-२०१६). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेरळ परिसरात (ता.कर्जत, जि.रायगड) येथील उल्हास नदीतील तलवडे पुलाजवळील नदीपात्रात अनेक दिवसांपासून बेकायदेशीरपणे मोठ्या प्रमाणात रेती उत्खनन होत असून याबाबत काही स्थानीक लोकांनी तक्रारी केल्या असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रेती उत्खनन करणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी विभागाकडे अपुरे मनुष्यबळ असल्याने कारवाई करणे शक्य होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अवैध रेती उत्खनन करणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी महसूल विभागाला लागणारी मनुष्यबळ व पोलीस दलाची मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-१०-२०१६) :** (१) व (२) अशा बाबी निदर्शनास आल्या नाहीत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्ह्यातील सन २०१५-१६ करीता संवदगांव, (ता.मालेगाव) येथील वाळू स्थळाकरीता जी देकार रक्कमबाबत**

**(९) ४३४७१ (२०-०४-२०१६). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील सन २०१५-१६ करीता संवदगांव, (ता.मालेगाव) येथील वाळू स्थळाकरीता जी देकार रक्कम ठरविण्यात आलेली चुकीची आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी होणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.प्रधान सचिव, महसूल विभाग यांना दिनांक ५ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-१०-२०१६) :** (१), (२), (३) व (४) स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ५ डिसेंबर, २०१५ रोजी जिल्हाधिकारी नाशिक यांना व दिनांक ७ डिसेंबर, २०१५ रोजी मा.मंत्री (महसूल) यांना निवेदन दिले आहे. सदर निवेदनाच्या अनुषंगाने संवदगांव या वाळूगटाच्या हातच्या किंमतीची तपासणी केली असता, जिल्हाधिकारी नाशिक यांनी वाळू /रेती निर्गती धोरण शासन निर्णय दिनांक १२.०३.२०१३ मधील तरतुदीनुसार हातची किंमत निश्चित करुन, त्यास विभागीय आयुक्त नाशिक यांची मान्यता घेतल्याचे निदर्शनास आले.
(५) प्रश्न उदभवत नाही.

---

**राज्यातील गृहनिर्माण सोसायट्यांना देण्यात आलेल्या शासकीय जमिनी**
**या संबंधित सोसायटयाना मालकी हक्काने देण्याबाबत**

**(१०) ४७१२५ (०५-०५-२०१६). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील गृहनिर्माण सोसायट्यांना भाडेकराराने देण्यात आलेल्या शासकीय जमिनी या संबंधित सोसायट्याना मालकी हक्काने देण्याचा निर्णय शासनाने माहे जानेवारी, २०१६ वा त्या दरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करीत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-१०-२०१६):** (१) व (२) राज्यातील गृहनिर्माण सोसायट्यांना भाडेकराराने देण्यात आलेल्या सरकारी जमिनी मालकी हक्काने देण्याचा निर्णय अद्याप घेण्यात आलेला नाही. मुंबई शहर व उपनगर जिल्ह्यातील भाडेपट्टयाने देण्यात आलेल्या शासकीय जमीन भोगवटदार वर्ग-२ या धारणाधिकार तत्वावर मंजूर करुन घेण्याचा पर्याय भाडेपट्टेधारकांना शासन निर्णय दि.१२.१२.२०१२ अन्वये देण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नवी मुंबईत कोयना प्रकल्पग्रस्तांच्या ओवे कॅम्प येथील खाणकाम बंद करण्याबाबत**

**(११) ४९३०९ (०५-०५-२०१६). श्री.काशिराम पावरा (शिरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबईत कोयना प्रकल्पग्रस्तांच्या ओवे कॅम्प येथे खाणकामाला सिडकोने परवानगी दिली असून येथे दररोज होणाऱ्या स्फोटामुळे घराला तडे जाऊन येथील रहिवाशांना बेघर होण्याची वेळ येणार असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी सुरू असलेले खाणकाम बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, तसेच स्फोटग्रस्तांचे भरपाईसाठी कोणती उपाययोजना करण्यात आली,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-१०-२०१६) :** (१) व (२) मौजे ओवे, ता.पनवेल येथील सर्व्हे नं. ३५५ व ३५६ मध्ये जिल्हाधिकारी रायगड, उपविभागीय अधिकारी पनवेल व तहसिलदार पनवेल यांनी १९९१-२०१६ या कालावधीत वेळोवेळी संबंधित यंत्रणांची मान्यता घेवून गौण खनिज उत्खननासाठी संबंधितांना परवाने मंजूर केले आहेत.

संबंधित परवानधारकांनी संबंधित प्राधिकरणाची परवानगी घेवून गौण खनिजाच्या उत्खननासाठी स्फोटकांचा वापर केला आहे.

सदर खाणीबाबत प्राप्त तक्रारीनुसार तहसिलदार पनवेल यांनी केलेल्या चौकशी व स्थळपाहणीमध्ये प्रस्तुत खाणकाम क्षेत्र हे ओवे कॅम्प येथील लोकवस्तीपासून सुमारे ५५० मीटर पेक्षा जास्त अंतरावर आहे. ओवे कॅम्प येथे सुमारे ३०० घरांची लोकवस्ती असून, लोकवस्तीच्या मध्यभागी असलेल्या १६ घरांना तडे गेल्याचे निदर्शनास आले आहे.

सद्यस्थितीत सदर खाणींमधील उत्खनन बंद आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**दापचारी (ता.डहाणू, जि.पालघर) दुग्ध प्रकल्पातील आदिवासींच्या जमिनी प्रकल्पाच्या नावाने अधिकारी व कर्मचारी यांनी हडप केल्याबाबत**

**(१२) ५०३४३ (२०-०४-२०१६). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापचरी (ता.डहाणू, जि.पालघर) दुग्ध प्रकल्पासाठी आदिवासींच्या जमिनी संपादन करुन आदिवासींच्या सर्वांगिण विकास हा शासनाचा मुळ उद्देश असताना दुग्ध प्रकल्पातील अधिकारी-कर्मचारी यांनी पदाचा गैर वापर करुन कृषी क्षेत्रावर बेकायदेशीररित्या (विना परवानगी) राहून त्यानी अनेक वर्ष, वीज, पाणी इत्यादी सुख-सुविधा उपभोगल्या असल्याचे दि.०४.नोव्हेंबर.२०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१८-१०-२०१६) :** (१) आरे दुग्धवसाहतीच्या धर्तीवर मुंबई शहराबाहेर नवीन दुग्धवसाहत स्थापन करण्यासाठी दापचरी येथे दुग्ध प्रकल्पाची निर्मिती करण्यात आली. स्थानिकांच्या रोजगार संधी व दुधाचा जोडधंदा उपलब्ध होण्याच्या दृष्टिने दापचरी दुग्ध प्रकल्पामध्ये सन १९७४ ते १९७९ या कालावधीत एकूण २७० दुग्धव्यवसाय क्षेत्रे निर्माण

करण्यात आली. पैकी १७० क्षेत्रे संलग्न पध्दतीची तर १०० क्षेत्रे गावठाण पध्दतीची आहेत. सदर दुग्धव्यवसाय क्षेत्रांचे वाटप वर्तमानपत्रातून जाहिरात प्रसिध्द करून अर्ज मागवून निवड समितीमार्फत मुलाखतीद्वारे पात्र ठरलेल्या व्यक्तींना भाडेकराराचे करारनामे करून वाटप करण्यात आले आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गौण खनिजावरील रॉयल्टी १०० टक्के वाढविल्याबाबत**

**(१३) ५१९५७ (२०-०४-२०१६). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने दिनांक ११ मे, २०१५ पासून गौण खनिजावरील रॉयल्टी १०० टक्के वाढवून २०० रु.प्रती ब्रास असलेली ४०० रु. प्रती ब्रास केल्यामुळे सातारा जिल्हयातील खाण व स्टोन क्रेशरधारकांचे उदयोग चालविणे अडचणीत आल्यामुळे दिनांक ३ डिसेंबर, २०१५ पासून बंद पुकारला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गौण खनिज उद्योग बंद पुकारल्यामुळे सर्वसामान्य जनतेला घर बांधणेही महाग झाले असून विकासाच्या दृष्टीकोनातून रस्ते, पूल, शासकी इमारती इ.बांधकामाचा खर्च सुध्दा वाढणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत लोकप्रतिनिधींनी तसेच सातारा जिल्हा खाण व क्रेशर उद्योजक संघटना यांनी मा.महसूल मंत्री यांच्याकडे माहे नोव्हेंबर-डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यादरम्यान निवेदने दिले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या निवेदनावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-१०-२०१६) :** (१), (२), (३) व (४) महाराष्ट्र राज्य खाण व क्रशर उद्योजक महासंघ व इतर संघांनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने, मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक २३.१२.२०१५ रोजी विधानसभेत स्वामित्वधनाच्या दरवाढीबाबत पुनर्विचार करुन निर्णय होईपर्यंत, दर वाढीपैकी ५० टक्के दरवाढ स्थगित करण्यात येईल असे निवेदन केले होते.

उक्त निवेदनाच्या अनुषंगाने दगड व जांभा दगड या गौण खनिजांवरील स्वामित्वाधनाच्या दरात शासनाने दिनांक ११.०५.२०१५ च्या अधिसूचनेन्वये केलेल्या वाढीपैकी ५०% दरवाढ पुढील आदेशापावेतो स्थगित करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पर्ससिन नेट सारख्या विनाशकारी मासेमारीवर पुर्णतः बंदी घालण्याबाबत**

**(१४) ५३६११(०८-०६-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **मस्त्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जगभरातील छोट्या व पारंपारिक मच्छिमारांचे दारिद्र्य निर्मूलन होऊन मत्स्य व्यवसायाचा शाश्वत विकास करावयाचा असेल तर पर्ससिन नेट सारख्या विनाशकारी मासेमारीवर पूर्णतः बंदी घालावी अशी मागणी दि. २७ जानेवारी, २०१६ रोजी मालवण येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळेत पारंपारिक मच्छिमारांनी केली, हे खरे आहे काय,

(२) संयुक्त राष्ट्राच्या अन्न आणि कृषी संघटनेच्या सदस्य देशाद्वारे अन्नसुरक्षा आणि गरिबी निर्मूलनाच्या संदर्भात शाश्वत छोट्या प्रमाणावरील मत्स्यव्यवसाय सुरक्षित करण्यासाठी स्वेच्छिक दिशानिर्देशक स्वीकारलेल्या विषयी जनजागृती व्हावी याकरिता मालवणच्या (जि.सिंधुदूर्ग) धुरीवाडा येथील संस्कार सभागृहात जगभरातील छोट्या मच्छिमारांच्या संरक्षणासाठी तयार करण्यात आलेल्या दिशा निर्देशकांची माहिती देण्यासाठी दि.२७ जानेवारी, २०१६ रोजी एकदिवशीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(३) असल्यास याप्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पर्ससिन नेटवर बंदी घालण्याच्या दृष्टीने, शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. महादेव जानकर (१६-०७-२०१६) :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) कार्यशाळेच्या माध्यमातून मत्स्यव्यवसायाचा शाश्वत विकास करण्यासाठी तसेच छोट्या व पारंपारिक मच्छिमारांच्या संरक्षण होण्यासाठी पर्ससीन नेटद्वारे होणाऱ्या मासेमारीवर बंदी घालण्याची मागणी करण्यात आली होती. शासनाने दि.५ फेब्रुवारी, २०१६ रोजीच्या अधिसुचनेनुसार काही अटींच्या अधीन राहून पर्ससीन नेटद्वारे होणाऱ्या मासेमारीवर निर्बंध घालण्यात आले आहेत.

---

**राज्यातील दूध उत्पादक शेतक-यांना दूधाची आधारभूत किंमत निश्चित करणेबाबत.**

**(१५) ५३७८० (१२-०८-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दूध उत्पादक शेतक-यांना दूधाची आधारभूत किंमत निश्चित करावी याकरीता, राज्य शासनाने जीवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५ अंतर्गत केंद्र शासनाला, दिनांक १९.०८.२०१५ रोजी पाठविलेल्या पत्राद्वारे विनंती केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दूध उत्पादक शेतकरी आणि ग्राहक यांना, रास्त दरात दूध उपलब्ध होण्यासाठी त्यावर आधारभूत किंमत निश्चित करण्याकरीता, केंद्राकडे पाठपूरावा करुन राज्य शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(३) तसेच, दूध भेसळ टाळण्यासाठी दूध वितरक कंपनी ते ग्राहक दरम्यान, वितरण प्रणालीवर नियंत्रण ठेवणेबाबत कोणती उपाय योजना केली आहे,
(४) असल्यास, प्रश्न भाग १ व २ नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२०-१०-२०१६) :** (१) व (२) होय. जीवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५ अंतर्गत जीवनावश्यक वस्तुंकरिता किमान आधारभुत किंमत निश्चित करण्याचे अधिकार केंद्र शासनास आहेत.

महाराष्ट्र राज्यातील दुध हाताळणी शासन, सहकार व खाजगी या तिन्ही क्षेत्रामार्फत होते. यामध्ये शासनाचा सहभाग केवळ ०.५% ते १% इतका आहे. असे असले तरी दुध उत्पादक शेतकरी यांना दुधाकरिता योग्य खरेदी दर व दुध ग्राहकांना रास्त दरात दुध उपलब्ध व्हावे हे लक्षात घेवुन राज्य शासनाने दुधाकरिता किमान आधारभुत किंमत निश्चित करण्याबाबत केंद्र शासनास विनंती केली असुन केंद्र शासनाने अद्यापी त्यांचा निर्णय राज्य शासनास कळविलेला नाही.
(३) अन्न व सुरक्षा कायदा २०११ मधील तरतुदीनुसार वितरीत होणाऱ्या दुधाची तपासणी करण्याचा अधिकार आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांना आहेत. मुंबई व ठाणे शहरामध्ये येणारे दुध मानकाप्रमाणे आहे किंवा नाही हे तपासण्यासाठी अन्न व औषध प्रशासन या कार्यालयामार्फत जकात नाक्यावर मोहिम राबविण्यात येते. सदर जकात नाका मोहिमेत दुधाची चाचणी त्याच ठिकाणी करून दुध कमी दर्जाचे आढळल्यास ते आलेल्या ठिकाणाकडे परत पाठविले जाते. तसेच धाडी जप्तीची कारवाई हाती घेवुन दुध भेसळीवर नियंत्रण ठेवण्यात येते. माहे एप्रिल, २०१५ ते मार्च, २०१६ या कालावधीत एकुण १२५३ दुध नमुने घेण्यात आलेत. यापैकी कमी दर्जाच्या नमुन्या प्रकरणी ६६ न्यायनिर्णय प्रकरणे व ८२ तडजोड प्रकरणे दाखल करण्यात आले आहेत. आढळून आलेल्या ४४ असुरक्षित नमुन्याबाबत मा.न्यायालयात अन्न व औषध प्रशासनाकडून खटले दाखल करण्यात आले आहेत.
(४) राज्य शासनाने दुधाकरिता किमान आधारभुत किंमत निश्चित करण्याबाबत केंद्र शासनास विनंती केली असुन या संदर्भात केंद्र शासनाच्य निर्णयाची प्रतिक्षा आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पर्ससिनेट मच्छीमारीवरील बंदीमुळे बेरोजगारी मोठया प्रमाणात वाढल्याबाबत**

**(१६) ५४०४७ (१२-०८-२०१६). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने दिनांक ५ फेब्रुवारी, २०१६ रोजी अध्यादेश काढून पर्ससिननेटद्वारे होणाऱ्या मासेमारीवर बंदी घातली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मासेमारी बंदीमुळे नौकाचालक, खलाशी, तांडेल, मासळी वाहतूक करणारे वाहनचालक, मासळी प्रक्रिया करणाऱ्या कंपन्यांमधील कामगार बर्फाच्या कारखान्यातील कामगार, पर्ससिन जाळी शिवणारे कारागिर यांच्यासह अन्य जोडधंदे असणारे असंख्य कामगार बेरोजगार झाले आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने बेरोजगार झालेल्या कामगारांना रोजगार मिळवून देण्यासाठी मच्छिमारीवरील घातलेली बंदी उठविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१९-१०-२०१६) :**(१) होय हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) दिनांक ५.७.२०१६ च्या पत्रान्वये राज्याच्या जलधी क्षेत्राबाहेर निषिध्द क्षेत्र व नेमून दिलेल्या कार्यकाळा व्यतिरिक्त मासेमारी करण्यास काही अटीच्या अधिन राहून परवानगी देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मराठवाड्यातील दुग्ध उत्पादनात गेल्यावर्षीच्या तुलनेत जवळपास दीड लाख लिटरची घट झाली असल्याबाबत**

**(१७) ५४३३९ (१२-०८-२०१६). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाड्यातील दुग्ध उत्पादनात गेल्यावर्षीच्या तुलनेत जवळपास दीड लाख लिटरची घट झाली असल्याचे माहे एप्रिल २०१६, वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या वर्षी मार्च अखेर प्रतिदिन ६.९० लाख लिटर दूध संकलित झाले तर याचे प्रमाण गेल्यावर्षी ८.३३ लाख लिटर इतके होते आणि फेब्रुवारी २०१६ पर्यंत मराठवाड्यातील आठही जिल्ह्यात शासकीय, सहकारी व खाजगी दुध संस्थांमार्फत ७.४८ लाख लिटर दुध संकलित झाले असून मार्च अखेरीस संकलित केलेल्या दुधाचे प्रमाण (६.९० लाख लिटर) पाहता केवळ महिनाभरात तब्बल ५८ लाख लिटर दुध उत्पादन चारा व पाणी टंचाईसह विविध समस्यांमुळे घटले आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दुधाचे घटलेले प्रमाण वाढविण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२०-१०-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) व (३) माहे मार्च-२०१६ च्या अखेरीस फेब्रुवारी-१६ च्या तुलनेत प्रतिदिन ५८,००० लिटर दुधाची घट झालेली आहे.

गतवर्षी कमी झालेले पर्जन्यमान व उन्हाची तीव्रता या मुळे मराठवाडा विभागात निर्माण झालेल्या दुष्काळ सदृष्य परिस्थितीमुळे पाणी टंचाई व चाऱ्याची उपलब्धता कमी होती. त्यामुळे मराठवाडा विभागात दुध संकलनात घट झाली आहे हे खरे आहे.
(४) व (५) मार्च ते ऑगस्ट हा दुध उत्पादनाच्या दृष्टिने कृश काळ असतो. त्यामुळे या कालावधीत नैसर्गिकरित्या दूध संकलनात घट होत असते.

दूध उत्पादक शेतकऱ्याचे हित जोपासण्याच्या शासनाने नेहमी प्रयत्नशील आहे. राज्यामध्ये निर्माण झालेली दुष्काळ परिस्थिती लक्षात घेता शासनाने दिनांक ३१/७/२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत गतिमान वैरण विकास कार्यक्रम राबविण्यास मान्यता दिली असून त्याअंतर्गत रूपये २५ कोटी निधी मंजूर केला आहे. तसेच हायड्रोपोनीक तंत्रज्ञानाद्वारे हिरवा चारा उत्पादनाकरिता दिनांक १४/९/२०१५ अन्वये रूपये १० कोटी निधी मंजूर केला आहे. सदर कार्यक्रमाअंतर्गत देण्यात येणाऱ्या अनुदानाकरिता लाभार्थी निवडतांना पशुधन असणाऱ्या अल्प व अत्यल्प भूधारक शेतक-यांना प्राधान्य देण्यात आले आहे.

---

## कोकणातील बेदखल कुळांच्या समस्यांबाबत अभ्यास समितीने शासनाला सादर केलेल्या अहवालाबाबत

**(१८) ५४४०५ (१९-०६-२०१६). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाच्यावतीने स्थापन बेदखल कुळ अभ्यास समितीने माहे जुलै, २०१५ रोजी वा त्या दरम्यान मध्ये कोकणचा दौरा करून कोकणातील बेदखल कुळांच्या समस्यांबाबत शासनाला अहवाल सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अहवालावर शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे अथवा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-१०-२०१६) :** (१) होय.
(२) कोकणातील बेदखल कुळांच्या समस्यांचे निराकरण करण्याच्या दृष्टीने विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास समिती दिनांक १२.९.२०१४ रोजी गठीत करण्यात आली असून सदर समितीने त्यांचा शिफारशीसह अहवाल सादर केला असून अहवालाची शासनस्तरावरुन छाननी सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील मालाड पश्चिमेकडील मालवणी कोळीवाडा परिसरातील खाडीमुखाशी असलेल्या दोन हेक्टर जागेवर नौदलाने भराव टाकल्याबाबत**

**(१९) ५५८३३ (१२-०८-२०१६). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मालाड पश्चिमेकडील मालवणी कोळीवाडा परिसरातील खाडीमुखाशी असलेल्या दोन हेक्टर जागेवर नौदलाने टाकलेल्या १५ फुट उंचीच्या भरावामुळे खाडीचे अर्ध्याहून अधिक पात्र बुलजवले गेले आहे यामुळे या भागातील माशांची प्रजननस्थळे पूर्णपूणे नष्ट झाली असून याचा परिणाम येथील मासेमारीवर होत असल्याचे माहे एप्रिल, २०१६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने मच्छिमाराचा प्रश्न सोडविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१९-१०-२०१६) :**(१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) सदरचे क्षेत्र हे संरक्षण विभागाच्या नौदालाच्य अखत्यारीतील प्रतिबंधित क्षेत्र आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**साक्री (जि.धुळे) तालुक्यातील पिंपळनेर परिसरातील तीनशेपेक्षा आधिक लोकवस्तीच्या वाड्या-पाडयांना महसूली गांवाचा दर्जा देण्याबाबत**

**(२०) ५६०७४ (१९-०८-२०१६). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साक्री (जि.धुळे) तालुक्यातील पिंपळनेर परिसरातील तीनशेपेक्षा आधिक लोकवस्तीच्या वाड्या-पाडयांना महसूली गांवाचा दर्जा देणार असल्याची घोषणा मा.महसूलमंत्री यांनी माहे मे २०१६ रोजी वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१९-१०-२०१६) :**(१) व (२) साक्री (जि.धुळे) तालुक्यातील बर्डीपाडा, विजयपूर, रानईपाडा, हरपाडा, कोळपाडा, रामपुरा, भिलखडी, होळ्याचा पाडा, माळपाडा, वरपाडा, डोंगराळ, चावडीपाडा, आंबेमोहर व बारीपाडा अशा एकूण १४ गावांना महसूली गावाचा दर्जा देण्याबाबत तहसिलदार, धुळे. उप वनसंरक्षक धुळे वनविभाग, धुळे यांचेकडून चौकशी करुन परिपूर्ण प्रस्ताव / अहवाल मागविण्यात आलेला आहे. संबंधितांकडून चौकशी अहवाल/प्रस्ताव प्राप्त होताच महसूल गावे घोषित करण्याबाबत जिल्हाधिकारी, धुळे यांचेकडून आवश्यक ती कार्यवाही करण्याचे योजिले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील अडचणींत सापडलेल्या इमू पालन शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्याबाबत**

**(२१) ५६४६० (२०-०८-२०१६). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांनी सुरु केलेल्या इमू पालन उदयोगामुळे इमू शेतकरी प्रचंड आर्थिक अडचणीत सापडलेला असल्याने शेतकऱ्यांच्या मदतीसाठी सामाजिक संघटनेने मा.मुख्यमंत्री, मा.कृषीमंत्री यांचेकडे दिनांक २१ मे, २०१६ तसेच वारंवार मागण्या केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी शेतकऱ्यांच्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती अडचणींत सापडलेल्या इमू पालन शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी लवकरात लवकर निर्णय घेऊन आवश्यक उपाययोजना करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१९-१०-२०१६) :**(१) व (२) होय, हे खरे आहे. महाराष्ट्र राज्य इमु पालन समिती यांनी दि.२२ मे, २०१६ च्या पत्रानुसार राज्यातील इमु शेमकऱ्यांच्या प्रलंबित कर्जमाफीसाठी भारत सरकारकडे शिफारस होण्याबाबत विनंती केलेली आहे.

(३) व (४) दि. २२ मे, २०१६ च्या पत्राच्या संदर्भात शासनाने दि. १६ जून, २०१६ च्या पत्रान्वये इमुपालक शेतकऱ्यांना त्यांच्या व्यवसायात झालेल्या नुकसानीबाबत योग्य ती कार्यवाही करणेबाबत नाबार्डला विनंती करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली जिल्हा भूमि अभिलेख कार्यालयात गेल्या तीन वर्षापासून घरे, जमिनीच्या वादाची हजारो प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत**

**(२२) ५६६९६ (१९-०८-२०१६). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हा भूमि अभिलेख कार्यालयात गेल्या तीन वर्षापासून घरे, जमिनीच्या वादाची हजारो प्रकरणे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास या कार्यालयात चार उपअधिक्षकांची व लिपिकांसह अन्य पदेही रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरची पदे रिक्त असल्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदरची रिक्त पदे भरुन प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढण्या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१९-१०-२०१६)** :(१) व (२) जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, सांगली या कार्यालयामध्ये ३ वर्षापेक्षा जास्त कालावधीची १२२ अपील प्रकरणे प्रलंबित आहेत. जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख सांगली या कार्यालयात ८ पैकी ३ लिपिकांची पदे रिक्त असून या कार्यालयात उपअधीक्षक भूमि अभिलेख हे पद नाही.
(३) जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख सांगली कार्यालयातील ३ लिपीकांची पदे पदोन्नती, बदली व सेवानिवृत्तीमुळे रिक्त झालेली आहेत.
(४) व (५) उप अधीक्षक भूमि अभिलेख संवर्गातील पदे पदोन्नतीने भरणेसाठीची कार्यवाही प्रगती पथात आहे. लिपीक वर्गीय पदे सरळ सेवेने भरणेची कार्यवाही उप संचालक भूमि अभिलेख, पुणे प्रदेश, कार्यालयाचे स्तरावरुन करण्यात येत आहे.

जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, सांगली कार्यालयात अपील प्रकरणांची आवक जास्त असल्याने व अपील प्रकरणे ही अर्धन्यायिक स्वरुपाची असलेने त्यांचा निपटारा करणेसाठी अवधी लागत आहे. तथापि सदर प्रकरणे ३१ मार्च, २०१७ पुर्वी निकालात काढण्यासाठी संबंधितांना सूचित करण्यात आले आहे.

---

**किनगावराजा (ता.सिंदखेडराजा, जि.बुलढाणा) येथील पशुवैद्यकिय दवाखान्याच्या जागेवर अतिक्रमण झाल्याबाबत**

**(२३) ५६७६४ (१२-०८-२०१६). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) किनगावराजा (ता.सिंदखेडराजा, जि.बुलढाणा) येथील पशुवैद्यकिय दवाखान्यांच्या जागेवर अतिक्रमण झाल्यामुळे दवाखानाच्या दुरूस्ती व दवाखान्याच्या संरक्षण भिंतीचे काम प्रलंबित असल्याचे माहे मे, २०१६ च्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने या जागेवरील अतिक्रमण हटविण्याकरिता शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१९-१०-२०१६)** :(१) हे खरे आहे.
(२) व (३) किनगावराजा (ता.सिंदखेडराजा. जि.बुलढाणा) येथील पशुवैधीय दावाखान्याचा जागेवर अतिक्रमणाबाबत कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद बुलढाणा, उपविभाग जि.प.बांधकाम उपविभाग दे. राजा, सरपंच ग्रा.पं.किनगाव राजा, पशुधन विकास अधिकारी (वि), पशुसंवर्धन सिंदखेडराजा व पशुधन पयर्वक्षक पशुवैद्यकीय दवाखाना-२ किनगावराजा यांनी संयुक्तपणे सदर पशुवैद्यकीय दवाखान्याच्या जागेवरील अतिक्रमण हटविले असून सदरहू जागेच्या संरक्षण भिंतीचे काम अंतिम टप्यात आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गायी-म्हशींच्या दुधाचे प्रमाण वाढण्यासाठी देण्यात येणाऱ्या ऑक्सिटोसिन इंजेक्शनची नाशिक शहरात विक्रि होत असल्याबाबत**

**(२४) ५७०९९ (१२-०८-२०१६). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गायी-म्हशींच्या दुधाचे प्रमाण वाढण्यासाठी देण्यात येणाऱ्या ऑक्सिटोसिन इंजेक्शनची नाशिक शहरात मोठया प्रमाणात विक्री सर्रासपणे होत असल्याचे माहे मे, २०१६ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हे इंजेक्शन दिलेल्या गाय-म्हशींचे दूध मानवी शरीराला घातक आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास चौकशीच्या अनूषंगाने या इंजेक्शनच्या विक्रीवर बंदी घालून विक्री करणाऱ्यां संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१९-१०-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिंधुदूर्ग जिल्ह्यात बॉटूलिझम हा दुर्धर आजाराने गुरे मृत्युमुखी पडल्याबाबत**

**(२५) ५७१०१ (१२-०८-२०१६). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदूर्ग जिल्ह्यात बॉटूलिझम हा दुर्धर गुरांचा आजर सुरु झाल्याने माहे एप्रिल, २०१६ ते मे, २०१६ या कालावधीत मोठ्या प्रमाणात अनेक गुरे या आजाराने मृत्युमुखी पडले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर रोगाचे निर्मुलन करण्यासाठी पशुवैकीय दवाखान्यात औषधे उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१९-१०-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंदगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील खालसा म्हाळुंगे ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील कामतवाडी येथे धनगर लोक ५० वर्षा पासून सरकारी जमिनीत राहत असलेल्या जमिनीबाबत**

**(२६) ५७५८८ (१९-०८-२०१६). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंदगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील खालसा म्हाळुंगे ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील कामतवाडी येथे धनगर लोक ५० वर्षा पासून सरकारी जमिनीत राहत असताना तेथील काही व्यक्तीने महसूल विभागातील अधिकाऱ्यांना हाताशी धरुन धनगर समाज राहत असलेल्या जागेवर सातबारा स्वत:ची नावे लावून घेतली असल्याचे माहे एप्रिल, २०१६ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने सरकारी जमिनीच्या सातबारावर महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी संगनमत करुप काही व्यक्तीची नावे लावल्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-१०-२०१६) :**(१) नाही, मौजे म्हाळुंसे, ता. चंदगड, येथील सरकारी जमीन गट नं. ५८ अ मधील क्षेत्र तिलाशी जलविद्युत प्रकल्पग्रस्तांना दिनांक २३.०२.१९८९ च्या आदेशाने वाटप करण्यात आले आहे. सदर वाटप क्षेत्रापैकी भूखंड नं. ११४ व १२२ मध्ये ६ धनगर कुटुंबीय अक्रिमण करून घर बांधुन राहात आहेत, तथापि त्यांची नावे गा.न.नं. ७/१२ पत्रकी दाखल झालेली नाहीत.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिन्नर (जि.नाशिक) पंचायत समितीच्या पशुसंवर्धन विभागात अनेक पदे रिक्त असल्याबाबत**

**(२७) ५७६७६ (१२-०८-२०१६). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिन्नर (जि.नाशिक) पंचायत समितीच्या पशुसंवर्धन विभागात पशुधन विकास अधिकाऱ्यांसह परिचर, पर्यवेक्षक आदी सुमारे १२ पदे गेल्या ८ ते ९ महिन्यापासून रिक्त असल्याने सदर कर्मचाऱ्यांना रिक्त पदाचा अतिरिक्त भार इतर कर्मचाऱ्यावर सोपविल्याने त्याचा परिणाम त्याच्या सेवांवर झाल्याने शेतकऱ्यांच्या पशुधनावर उपचार करण्यासाठी मोठी गैरसोय होत असल्याची बाब माहे एप्रिल, २०१६ च्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तालुक्यात सुमारे ९० हजारापेक्षा अधिक पशुधन असून त्याच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी कर्मचाऱ्यांची संख्या कमी असल्याने रिक्त जाग लवकरात लवकर भरण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.पशुसंवर्धन मंत्री. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, नाशिक यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१९-१०-२०१६) :** (१) होय अशंत: खरे आहे.

पशुधन विकास अधिकारी (वि) पंचायत समिती सिन्नर (जि.नाशिक) हे पद रिक्त आहे, सदर रिक्त पदाचा अतिरिक्त कार्याभार पशुधन विकास अधिकारी, पवैद श्रेणी-१ कुलवंडी ता.पेठ यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. तसेच सदर पशुवैद्यकीय दवाखान्यात पशुधन पर्यवेक्षकाची ०३ पदे व परिचराची ०२ पदे रिक्त आहेत. सदर पदे रिक्त असली तरी रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार अन्य अधिकारी/ कर्मचारी यांचेकडे सोपविण्यात येऊन त्यांचे द्वारे पशुपालकधारकांना नियमितपणे वैद्यकीय सेवा पुरविण्यात येत आहेत. त्यामुळे पशुधनावर उपचार करण्यासाठी कुठल्याही प्रकारची गैरसोय झालेली नसुन कुठल्याही प्रकारचा साथीचा रोग किंवा जनावरांमध्ये मरतुक झालेली नाही.
(२) हे खरे आहे,

स्थानिक लोकप्रतिनिधी, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी नाशिक यांच्याकडे रिकत पदे भरण्याबाबत लेखी निवेदनाद्वारे मागणी केलेली नाही.
(३) पशुधन विकास अधिकारी (गट-अ) या संवर्गातील रिक्त पदे भविष्यात पदोन्नती व सरळसेवेद्वारे भरण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

सदर पशुवैद्यकीय दवाखान्यातील पशुधन पर्यवेक्षक व परिचर या गट-क व ड संवर्गातील रिक्त पदे ही जिल्हा परिषद, नाशिक यांचे मार्फत भरण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे,
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कोल्हापूर जिल्हयात पशुवैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्ययाबाबत

**(२८) ५७९५२ (१२-०८-२०१६). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हा दूध उत्पादनांत अग्रेसर असून जिल्हयात पशुवैद्यकीय महाविद्यालय स्थापन करावे अशी मागणी वारंवार कोल्हापूरवासियांनी करुनही पशुवैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याबाबत शासनाने निर्णय घेतला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोल्हापूर जिल्हयात पशुवैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे,
(३) अद्यापपर्यंत कोणताच निर्णय घेतला नसल्यासविलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२०-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही,
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परळी औष्णिक वीजनिर्मिती केंद्रासाठी लागणारे पाणी कायमस्वरुपी उपलब्ध व्हावे यासाठी नांदेड शहरातील सांडपाणी परळीपर्यात पाइपलाइनद्वारे आणण्याबाबत**

**(२९) ५८०७६ (१६-०८-२०१६). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.आर. टी. देशमुख (माजलगांव) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परळी औष्णिक वीजनिर्मिती कैंद्रासाठी लागणारे पाणी कायमस्वरुपी उपलब्ध व्हावे यासाठी नांदेड शहरातील सांडपाणी परळी पर्यात पाइपलाइनद्वारे आणण्यासाठी शासनाने रू.५४७ कोटी रूपयांची योजना तयार केली असल्याचे माहे जुन, २०१६ रोजीच्या पहिल्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, परळी औष्णिक वीजकेंद्र पाण्याअभावी अत्यल्प वीजनिर्मिती करित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नांदेड महानरपालिकेने सांडपाणी परळी औष्णिक वीजकेंद्रास दिल्यास, वीजनिर्मितीची क्षमता वाढेल, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नांदेड शहरातील सांडपाणी परळीपर्यंत पाइपलाइन्द्वारे आणण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे काय वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाचे कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-१०-२०१६) :**(१) नांदेड महानगरपालिकेचे सांडपणी प्रक्रिया करुन पाईपलाईनद्वारे परळी औष्णिक वीज निर्मिती केंद्रासाठी वापरण्याकरीता योजना महानिर्मिती कंपनीच्या विचाराधीन आहे.
(२) होय, हे खरे आहे,

परळी औष्णिक वीज केंद्र पाण्याअभावी जुलै २०१५ पासून पुर्णपणे बंद आहे.

(३) सदर योजनेद्वारे प्रक्रिया केलेल्या पाण्यावर २५० मे.वॅ.चा एक संच सुरु होईल.
(४) महानिर्मीती कंपनीने या योजनेस प्रशासकीय मंजरी दिनांक १५.०६.२०१६ च्या ठरावाद्वारे दिलेली असून या कामाच्या पूर्वअर्हता पात्रतेसाठी वृत्तपत्रामध्ये दिनांक २७.०६.२०१६ च्या वृत्तपत्रामध्ये जाहिरात दिली आहे, सदर कामाच्या पूर्वअर्हता पात्रतेसाठी इच्छुक संस्थाची कागदपत्रे तपासणीची कार्यवाही सुरु नाही,
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औढा नागनाथ येथील पशवैद्यकीय रूग्णालयात तांत्रिक कर्मचारी नसल्याबाबत**

**(३०) ५८१६१ (१२-०८-२०१६). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औढा नागनाथ येथील पशवैद्यकीय रूग्णालयात तांत्रिक कर्मचारी नसल्याने मागील तीन वर्षा पासून यंत्रसामग्री पडून असल्याचे माहे मे, २०१६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) तसेच या ठिकाणी मोठ्याप्रमाणात जणावरांना उपचारांसाठी आणले जाते मात्र येथे औषधाचा तूटवडा वेळोवेळी जानवतो हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१९-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही. तालुका लघु पशुवैद्यकीय सर्वचिकित्ससालय, औढा नागनाथ येथील ५ मंजूर पदांपैकी ३ पदे भरलेली असून २ पदे रिक्त आहेत. तसेच एक्स-रे मशीन सोनोग्राफी, बायोकेमीकल ॲनालयायझर, हिमॅटॉलॉजीकल ॲनालयाझर, सेंट्रीफयुगल मशीन, कॅसट्रेटर, मायक्रोस्कोप इत्यादी यंत्र सामुग्री उपलब्ध आहे. व त्या यंत्रसामुग्रीचा वापर पशुधन विकास अधिकारी व पशुधन पर्यवेक्षक आवश्यक तेथे रोग निदानासाठी वापर करीत आहेत.

(२) तालुका लघु पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय, औढा नागनाथ हे तालुक्यांचे ठिकाण असल्यामुळे मोठ्या प्रमाणावर औषधोपचार करण्यासाठी जनावरे आणली जात असल्यामुळे सर्व जनावरांना उपलब्ध औषध साठयातुन औषधोपचार करून पशुपालकांना सेवा पुरविल्या जातात.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**हिंगोली येथील पशुसंवर्धन चिकित्सालयाचे कामकाज**
**निजामकालीन ईमारतीतच सुरू असल्याबाबत**

**(३१) ५८१६४ (१२-०८-२०१६). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली येथील पशुसंवर्धन चिकित्सालयाचे कामकाज मागील अनेक वर्षा पासुन निजामकालीन ईमारतीतच सुरू असल्याचे माहे एप्रिल, २०१६ च्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच निजामकालीन ईमारतीला मोठ्या प्रमानावर भेगा पडल्या असून येथे डॉक्टरांना काम करणे धोकादायक असल्याचे निदर्शनास आले आहे काय,

(३) असल्यास, शासनाकडे नविन ईमारत बांधकामसंदर्भात अनेकवेळा पत्र व्यवहार करुनही अदयाप कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने ठोस निर्णय घेण्याबाबत काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१९-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही, हिंगोली येथील पशुवैद्यकीय दवाखान्याच्या इमारतीचे बांधकाम सन १९६२ मध्ये झाले असून त्यावेळेपासून पशुसंवर्धन चिकित्सालय या इमारतीत कार्यरत आहे.

(२) सदर इमारत जूनी असली तरी धोकादायक नसल्याचे निदर्शनास आले आहे

(३) हिंगोली ही नवनिर्मित जिल्हा असल्यामुळे सन २०१२ पासून हिंगोली येथे जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालयाची स्थापना करण्यात आलेली आहे. त्यासाठी जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालयाचे टाईपप्लॅन नुसार नविन ईमारत बांधकाम प्रस्तावित आहे. सदर बांधकामासाठी लागणारा आवश्यक निधी सन २०१७-१८ चे जिल्हा प्रारुप आराखडयामध्ये प्रस्तावित करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील नंदेश्वर येथील पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी १ ची इमारतीला तडे गेल्याबाबत**

**(३२) ५८२३४ (१२-०८-२०१६). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा तालुक्यातील नंदेश्वर येथील पशुवैद्यकीय दवाखान्याची श्रेणी १ ची इमारतीच्या छतावर झाडे उगविल्यामुळे भिंतीला तडे जाऊन इमारतीला धोका निर्माण झाला असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने दवाखान्याच्या दुरुस्तीसाठी शासनाने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१९-१०-२०१६) :** (१) हे खरे आहे,

(२) व (३) होय. सदर दवाखान्याची इमारत मोडकळीस आली असून वापरण्यास धोकादायक झाल्यामुळे इमारत पाडणे बाबत उपविभागीय अभियंता जि.प.बांध. उपविभाग मंगळवेढा यांनी कळविले आहे, त्यानुसार इमारत पाडणे बाबत आवश्यक त्या मान्यता घेण्यात येत आहेत.

सद्यस्थितीत सदर दवाखाना सन २००७-२००८ मध्ये विस्तारीकरणामध्ये बांधण्यात आलेल्या दोन खोल्यांमध्ये सुरू आहे. तसेच जिल्हा वार्षिक योजनेमधून सदर ठिकाणी नवीन इमारत बांधकामासाठी सन २०१७-१८ च्या प्रस्तावित प्रारुप आराखड्यामध्ये समावेश करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सलगर (ब्रु) (ता.जि.सोलापूर) येथील प्रथमश्रेणी पशुवैद्यकीय दवाखान्याच्या नवीन इमारतीचे उद्घाटन केले नसल्याबाबत**

**(३३) ५८२६० (१२-०८-२०१६). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सलगर (ब्रु) (ता.जि.सोलापूर) येथील प्रथमश्रेणी पशुवैद्यकीय दवाखान्याच्या नवीन इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असूनही अद्यापही सदरहू इमारतीचे उद्घाटन करण्यात आले नसल्याचे माहे एप्रिल, २०१६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सलगरच्या प्रथमश्रेणी पशुवैद्यकीय दवाखान्याची मान्यता असून या दवाखान्यांतर्गत सलगर ब्रुदुक, सलगर खुर्द, आसवेवाडी, लवंगी आणि लंगलगी या गांवाना पशुवैद्यकीय सेवा पुरवली जात असून इथल्या शेतकऱ्यांनी शेतीला जोडधंदा म्हणून पशुपालन केले हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या पाच गावातील पशुधनाच्या आरोग्याच्या दृष्टीने सलगर पशुवैद्यकीय दवाखान्याच्या नव्या इमारतीचे उद्घाटन करण्यात येत नसल्याने या विभागातील ग्रामस्थ व त्यांच्या पशुधनाची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्याअनुषंगाने ग्रामस्थ व पशुधनाची होणारी गैरसोस दूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१९-१०-२०१६) :** (१) सलगर (बु) (जि.सोलापूर) येथील प्रथमश्रेणी पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ च्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असले तरी सदर नवीन इमारतीमध्ये विघुतीकरणाचे काम अपूर्ण असल्याने अद्याप नवीन इमारतीचे उद्घाटन करण्यात आलेले नाही,

(२) हे खरे आहे,

(३) व (४) हे खरे नाही. इमारतीमध्ये पशुवैद्यकीय दवाखान्याचे दैनंदिन कामकाज माहे एप्रिल, २०१५ पासून सुरू असून या दवाखान्यांतर्गत सलगर ब्रुदुक, सलगर खुर्द, आसवेवाडी, लवंगी आणि लंगलगी या गावांमधील पशुपालकांना पशुवैद्यकीय सेवा पुरविण्यात येत आहे. त्यामुळे पशुधनाची गैरसो होत नाही,

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील १२ तालुक्यापैकी ६ तालुक्यात उपअधिक्षक भूमिअभिलेख ही पदे रिक्त असल्याबाबत**

**(३४) ५८३८१ (१९-०८-०१६०). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील १२ तालुक्यापैकी ६ तालुक्यात उपअधिक्षक भूमिअभिलेख ही पदे रिक्त असल्याचे माहे मे, २०१६ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच वर्ग तीन ची ४० टक्के पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरची पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, रिक्त असलेली पदे तातडीने भरण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१९-१०-२०१६) :**(१) कोल्हापूर जिल्हृयात उप अधीक्षक भूमि अभिलेख या गट-ब संवर्गात एकूण १४ पदे मंजूर आहेत. सदर मंजूर पदांपैकी ८ अधिकारी कार्यरत असून ६ पदे रिक्त आहेत. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, (म.राज्य) पुणे यांचेकडील आदेश दिनांक १९/८/२०१६ ने उप अधीक्षक भूमि अभिलेख, शाहूवाडी व कागल ही पदे भरण्यात आलेली आहेत. उर्वरीत ४ तालुक्यातील रिक्त पदांमुळे नागरीकांच्या कामाची अडचण होवू नये म्हणून सदरचा पदभार अन्य तालुक्यातील अधिकारी यांचेकडे सध्या अतिरिक्तपणे सोपविण्यात आलेला आहे.

(२) व (३) कोल्हापूर जिल्हृयात भूमी अभिलेख विभागातील गट-क संवर्गातील पदे सेवानिवृत्ती/पदोन्नती/बदलीमुळे रिक्त झालेली असून, गट-क संवर्गामध्ये एकूण २५ टक्के पदे रिक्त आहेत.

(४) व (५) सन २०१६ मधील निवडसूचीवेळी गट-ब संवर्गामध्ये पदोन्नतीने नियुक्तीवेळी कोल्हापूर जिल्हृयातील रिक्त पदे भरणेकामी प्राधान्याने विचार करण्यात येईल. गट-क संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

---

## शेतकऱ्यांच्या दुधाला ३० रु. प्रतिलिटर भाव मिळणेबाबत

**(३५) ५८५४९ (१२-०८-२०१६). श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सध्या शेतकऱ्यांच्या दूधाला २० ते २२ रु. प्रतिलिटर भाव मिळत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्या दुष्काळग्रस्त परिस्थितीमुळे दुध उत्पादनावर होणारा खर्च हा येणाऱ्या उत्पन्नापेक्षा जास्त आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उत्पन्नापेक्षा खर्च जास्त असल्याने शेतकऱ्याला हा व्यवसाय परवडत नसल्याने व दुसरा कोणता पर्याय शेतकऱ्यांपुढे नसल्याने शेतकरी कर्जबाजारी होत असून त्यामुळे शेतकऱ्याच्या आत्महत्त्याचे प्रमाण वाढत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दुधाला प्रतिलिटर ३० रु. भाव मिळावा यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक. ६ जून २०१६ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने दुधाला ३० रु. भाव मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२०-१०-२०१६) :** (१) शासनाने शासकीय दूध खरेदी करीता दि.१.७.२०१६ पासुन गाय व म्हैस दूध खरेदी दरात प्रती लिटर रू.२/- अशी वाढ करून ते प्रती लिटर रू.२०/- वरून रू.२२/- अशी केली आहे हे खरे आहे.
(२) होय.
(३) दूध खरेदी दर कमी असल्याने शेतकरी आत्महत्या करतात अशी वस्तुस्थिती नाही. राज्यात दुध व्यवहार शासन, सहकार व खाजगी क्षेत्रामार्फत केला जातो. यामध्ये शासनाचा सहभाग केवळ ०.५ ते १ टक्के इतका आहे. शासन शासकीय दूध खरेदी करीता दूधाचे भाव ठरवित असते.

दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या हिताकरीता शासनाने नुकतीच शासकीय दूध खरेदी दरात प्रति लिटर रू.२/- अशी वाढ केली आहे. तसेच शासनाच्या दूध खरेदी दरानुसार राज्यातील सहाकारी दूध संघ/संस्था यांनी दूध उत्पादक शेतकऱ्यांना दूध खरेदी दर द्यावा अशा प्रकारचे निदेश दिनांक १०/७/२०१५ अन्वये शासनाने निर्गमित केले आहेत.

याशिवाय खाजगी क्षेत्रासह दूध खरेदी व विक्रीत दरात नियंत्रण व्हावे त्या दृष्टिने राज्य शासनाने केंद्रशासनास जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ मधील तरतुदीनुसार दूधाकरिता किमान आधारभूत किंमत निश्चित करावी अशी विनंती केली आहे.
(४) राज्यात दुधाकरिता कृषकाळ व पुष्टकाळ असे दोन काळ असतात. कृषकाळात दुधाचे उत्पादन कमी होत असते व पुष्टकाळात दुधाचे उत्पादन वाढते. त्यामुळे दुधाच्या कमतरतेत व वाढीव उत्पादनात सातत्याने दूध दराबाबत शासनाकडे सन्माननीय लोकप्रतिनिधी व दूध उत्पादक शेतकऱ्यांकडून मागणी होत असते. अशाप्रकारची निवेदने जुन, २०१६ मध्येही शासनास प्राप्त झालेली आहेत.
(५) खाजगी क्षेत्रासह दूध खरेदी व विक्रीत दरात नियंत्रण व्हावे यादृष्टिने राज्य शासनाने केंद्रशासनास जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ मधील तरतूदीनुसार दुधाकरिता किमान आधारभूत किंमत निश्चित करावी अशी विनंती केली आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शाहुवाडी (जि.कोल्हापूर) भूमिअभिलेख कार्यालयात कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(३६) ५८५५२ (१९-०८-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शाहुवाडी तालुक्यातील भूमिअभिलेख कार्यालयात गेल्या २१ वर्षापासून प्रभारी अधिकारी प्रशासन चालवत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास सदर भूमिअभिलेख कार्यालात कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याने नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास सदर भूमिअभिलेख कार्यालयातील रिक्त पदे भरण्यासाठी शासन कोणती कार्यवाही करणार आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१९-१०-२०१६) :**(१), (२) व (३) जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, (म.राज्य), पुणे यांचेकडील आदेश दिनांक १९/८/२०१६ ने उप अधीक्षक भूमि अभिलेख, शाहूवाडी हे पद भरणेत आलेले आहे. तसेच उप अधीक्षक भूमि अभिलेख, शाहूवाडी कार्यालयातील गट-क संवर्गात २ पदे रिक्त असून, सदरची रिक्त पदे सरळसेवा भरतीने भरण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

त्याचप्रमाणे गट-ड शिपाई संवर्गामधील रिक्त पदावर सरळसेवा भरतीने दिनांक ११/७/२०१६ पासून १ उमेदवार हजर झालेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मच्छिमारांच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत विशेष बैठक बोलवण्याची केलेली मागणी**

**(३७) ५९८५३ (१२-०८-२०१६). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक. १८ नोव्हेंबर २०१५ रोजीच्या निवेदनाद्वारे मा. मुख्यमंत्री महोदयांना महाराष्ट्रातील मच्छिमारांच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत विशेष बैठक बोलवण्याची मागणी केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रस्तुत बैठक अद्यापाही बोलवण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, मच्छिमार बांधवांच्या आर्थिक उन्नतीसाठी ही बैठक लवकरात लवकर होणे गरजेचे असल्याने याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१९-१०-२०१६) :** (१) होय. हे खरे आहे.
(२) हे खरे नाही. दिनांक ४ जुलै, २०१६ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांनी बैठक आयोजित केली होती.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**स्पीड बोट खरेदी करण्यासाठी मच्छिमारांना नाममात्र व्याज दराने दीर्घ मुदतीचे कर्ज देण्याबाबत**

**(३८) ५९९०६ (१२-०८-२०१६). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मच्छिमार व्यावसायिकांच्या प्रश्नांबाबत दिनांक.१० मार्च, २०१६ रोजीच्या दरम्यान मा.केंद्रीय कृषी मंत्री महोदयांसमवेत झालेल्या बैठकीत एक कोटी रूपयापर्यंत किंमत असलेली स्पीड बोट खरेदी करण्यासाठी मच्छिमारांना नाममात्र व्याज दराने दीर्घ मुदतीचे कर्ज देण्याबाबत चर्चा झाली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त बैठकीतील चर्चेच्या अनुषंगाने राज्य शासनाने निर्णय घेतला आहे काय,
(३) असल्यास, निर्णयाचे स्वरुप काय आहे व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१९-१०-२०१६) :**(१) नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नागपूरच्या धर्तीवर अमरावतीतही तहसीलचे ग्रामीण आणि शहर असे दोन भाग केले जावे असा पाठविलेला प्रस्ताव शासनाकडे प्रलंबति असल्याबाबत

**(३९) ६११११२ (१९-०८-२०१६). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूरच्या धर्तीवर अमरावतीतही तहसीलचे ग्रामीण आणि शहर असे दोन भाग केले जावे असा प्रस्ताव शासनाकडे मंजूरीसाठी पाठविण्यात आलेला प्रस्ताव मगील पाच वर्षापासून प्रलंबित असल्याचे माहे मे, २०१६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने अमरावती तहसीलचे शहर व ग्रामीण असे विभाजन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१९-१०-२०१६) :**(१) असे निदर्शनास आले नाही.
(२), (३) व (४) विभागीय आयुक्त, अमरावती यांनी दिनांक २३.५.२०१६ च्या पत्रान्वये अमरावती महानगरपालिका क्षेत्रामध्ये स्वतंत्र अप्पर तहसिलदार यांचे कार्यालय स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. त्यानुषंगाने अमरावती महानगरपालिका क्षेत्रामध्ये अप्पर तहसिलदार कार्यालय स्थापन करण्यासाठी आवश्यक असलेली पदे व त्याकरीता येणारा खर्च याबाबतच्या प्रस्तावास वित्त विभाग व उच्चस्तरिय सचिव समितीची मान्यता घेण्याच्या दृष्टीने कार्यवाही महसूल विभागाकडून सुरु आहे.

---

**कोल्हापुर जिल्ह्यामध्ये जमिनीच्या अनधिकृतरित्या औद्योगिक व वाणिज्य कारणाकरिता वापरात बदल केल्याचे प्रकरणी ४० पट दंड लागू केलेबाबत**

**(४०) ६१५९१ (१९-०८-२०१६). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापुर जिल्ह्यामध्ये जमिनीच्या अनधिकृतरित्या औद्योगिक व वाणिज्य कारणाकरिता वापरात बदल केल्याचे प्रकरणी जिल्हा प्रशासनाकडून ४० पट दंड नागरीकांना माहे मार्च २०१६ पासून लागू करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनधिकृत अकृषिक आकरणीच्या वापराबाबत ४० पट दंडाच्या आकरणीमुळे नागरीकांना मोठया प्रमाणावर आर्थिक भुर्दड बसत असल्यामुळे शासन स्तरावर अनधिकृत अकृषिक वापरासाठी शास्ती माफ करण्याचा निर्णय घेण्याची विनंती प्रस्तुत लोकप्रतिनिधी विधानसभा सदस्य, इचलकरंजी यांच्यासह कोल्हापूर जिल्हयातील लोकप्रतिनिधींनी माहे एप्रिल २०१६ रोजी वा त्यादरम्यान मा. महसूल मंत्री यांच्याकडे तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शास्ती माफ करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०७-१०-२०१६) :**(१) कोल्हापूर जिल्ह्यातील करवीन, हातकणंगले, राधानगरी, पन्हाळा, भुदरगड, कागल व शाहूवाडी या तालुक्यात जमिनीच्या अनाधिकृतरित्या औद्योगिक व वाणिज्य प्रयोजनार्थ वापरात बदल केल्याप्रकरणी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम ४५ व त्याखालील महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापरात बदल व अकृषिक आकारणी) नियम १९६९ मधील नियम ८ मधील तरतूदीस अनुसरुन त्या जमिनीवर अकृषिक आकारणीच्या ४० पटीहून अधिक नसेल इतका दंड आकारण्याबाबतच्या तरतूदीस अनुसरुन संबंधीत धारकांना नोटीसा लागू करण्यात आल्या आहेत.

(२), (३), (४) व (५) लोकप्रतिनिधी यांची दिनांक ०७.०३.२०१६ व दि.१०.०३.२०१६ रोजीची मा.मंत्री (महसूल) यांना दिलेली निवेदने प्राप्त झाली असून सदर निवेदनांमधील अनधिकृत अकृषिक वापरासाठी शास्ती माफ करण्याच्या मागणीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

---

**पालघर जिल्हयातील मनोर-वाडा-भिवंडी या रस्त्याच्या चौपदरीकरणाच्या कामामध्ये गौणखनिजाच्या ८.३० लक्ष ब्रास स्वामित्वधनाची चोरी केल्याबाबत**

**(४१) ६१८७४ (१९-०८-२०१६). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मनोर-वाडा-भिवंडी (जि.पालघर) रस्त्याच्या चौपदरीकरणाच्या कामामध्ये गौणखनिजाच्या ८.३० लक्ष ब्रास स्वामित्वधनाची चोरी झाली असून ती दंडासहित वसूल करण्याबाबतची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री तसेच मा.तत्कालिन महसूल मंत्री यांच्याकडे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात मा.तत्कालिन महसूल मंत्री यांनी जुलै व ऑक्टोबर, २०१५ मध्ये याप्रकरणाचा अहवाल तातडीने मागवूनही विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्याकडून गौणखनिजाच्या स्वामित्वधनाच्या चोरीबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने गौणखनिजांची चोरी करणाऱ्या कंत्राटदारांविरुध्द व याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्याविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-१०-२०१६) :**(१) यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(२), (३) व (४) मनोर-वाडा-भिवंडी या रस्त्याच्या कामासाठी गौण खनिजाची चोरी केल्यासंबंधी शासनास प्राप्त झालेल्या विविध निवेदनांच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त कोकण विभागा यांना त्यांच्या कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यामार्फत सखोल चौकशी करून कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी सदर प्रकरणाची उप आयुक्त (रोहयो) यांच्यामार्फत केलेल्या चौकशीत एकूण ७,५०,००८ ब्रास गौण खनिजाचे स्वामित्वधन शासनजमा केले नसल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार विभागीय आयुक्त कोकण विभाग यांनी जिल्हाधिकारी ठाणे जिल्हाधिकारी पालघर यांना पुढील कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पाचवड ते भूईंजवरील (जि.सातारा) कृष्णा नदी पुला दरम्यान बांधण्यात आलेल्या सर्व पूलांचे भराव वाहून गेल्याबाबत

**(४२) ६१९७५ (२४-०८-२०१६). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय महामार्ग क्र.४ च्या सुरु असलेल्या सहापदरीकरणामध्ये पाचवड ते भूईंजवरील (जि.सातारा) कृष्णा नदी पुलादरम्यान बांधण्यात आलेल्या सर्व पूलांचे भराव जून २०१६ मध्ये पडलेल्या पहिल्याच पावसात वाहून गेला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पुलाच्या बाजूने पादचाऱ्यांसाठी कोणतीच उपाययोजना केली नसल्याने तेथून ये जा करणाऱ्या स्थानिक नागरिकांना जीव मुठीत घेऊनच पूल ओलांडावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, हा पूल पूर्ववत बांधण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, याबाबतची चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीअंती संबंधित ठेकेदारांवर कोणती कारवाई केली आहे, नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-१०-२०१६)** :(१) हे खरे नाही,असे भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,पुणे यांनी कळविले आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही
(३) प्रश्न उद्भवत नाही
(४) प्रश्न उद्भवत नाही
(५) प्रश्न उद्भवत नाही

---

**पुसेगांव (ता.खटाव, जि.सातारा) येथील राज्य मार्ग १४२ लगत असणाऱ्या रस्त्यालगत मोठया प्रमाणात अतिक्रमण करण्यात आल्याबाबत**

**(४३) ६१९९३ (२४-०८-२०१६). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुसेगांव (ता.खटाव, जि.सातारा) येथील राज्य मार्ग १४२ लगत असणाऱ्या रस्त्यालगत मोठया प्रमाणात अतिक्रमण करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या ठिकाणी अतिक्रमण झाल्याने तेथील ग्रामस्थांनी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी सार्वजनिक बांधकाम विभाग, खटाव (जि. सातारा) तसेच जिल्हाधिकारी सातारा यांच्याकडे गेले सहा महिन्यांपासून वारंवार तक्रारी करुनही कोणतीच कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-१०-२०१६)** :(१) नाही, हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**किन्हीराजा (जि.वाशिम) तालुक्यातील वाशिमकडे जाणा-या मुख्य रस्त्यांची झालेली दुरावस्था**

**(४४) ६२११५ (२४-०८-२०१६). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) किन्हीराजा (जि.वाशिम) तालुक्यातील वाशिमकडे जाणा-या मुख्य रस्त्यांची दयनीय अवस्था झाली असल्याचे माहे जून, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कारणास्तव वाहन चालवितांना वाहनचालकांची गैरसोय होत असून काही प्रसंगी छोट्या अपघाताच्या घटनाही या कारणास्तव होत आहेत हे लक्षात घेता शासन त्वरीत आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,
(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-१०-२०१६)** :(१) हे खरे नाही,रस्ता वाहतूकीकरीता सुस्थितीत आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील जमिन, सदनिका, दुकाने इ. मालमत्तेची नोंदणी झाल्यानंतर त्याची प्रत (सॉफ्ट कॉपी) आता थेट इ. लॉकरमध्ये जमा केली जाणार असल्याबाबत

**(४५) ६२१४२ (१९-०८-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.जयकुमार गोरे (माण), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जमिन, सदनिका, दुकाने इ. मालमत्तेची नोंदणी झाल्यानंतर त्याची प्रत (सॉफ्ट कॉपी) थेट इ. लॉकरमध्ये जमा केली जाणार असल्याने नोंदणी व मुद्रांक विभागाने संगणक प्रणाली विकसीत केल्याने डिजिटल लॉकरची प्रणाली लिंक केली असल्याचे माहे मे, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने ही सुविधा कधीपासून कार्यान्वित केली जाणार आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-१०-२०१६)** :(१) होय. परंतु सदरची प्रणाली सध्या फक्त ई-जिस्ट्रेशन (ऑन लाईन नोंदणी) द्वारे नोंदणी होणाऱ्या Leave & License व First Agreement to Sale या दस्तऐवजांपुरती लागू करण्यात आलेली आहे.
(२) नाही.
(३) सदर सुविधा मे २०१६ पासून कार्यान्वित करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती जिल्ह्यातील नांदगाव खंडेश्वर येथील भूमिअभिलेख कार्यालयात उपअधिक्षक भूमि अभिलेख यांची नियुक्ती करण्याबाबत

**(४६) ६२१७८ (१९-०८-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील नांदगाव खंडेश्वर येथील भूमिअभिलेख कार्यालयाचा कारभार तब्बल ११ वर्षापासून कायमस्वरुपी उपअधिक्षक विना चालत असल्याचे माहे फेब्रुवारी २०१६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, १६१ गावांचा कारभार या कार्यालयाकडे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, येथील कामाचा व्याप पहाता या ठिकाणी कायमस्वरुपी उपअधिक्षक नियुक्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०९-२०१६) :**(१), (२), (३) व (४) होय, उप अधिक्षक भूमी अभिलेख नांदगाव खांडेश्वर हे पद रिक्त असल्यामुळे सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार त्याच कार्ययातील मुख्यालय सहाय्यक यांचेकडे सोपविण्यात आलेला आहे. उप अधिक्षक भूमि अभिलेख, नांदगाव खंडेश्वर या कार्यालयात३३ प्रकरणे मोजणीवर शिल्लक आहेत.

उप अधिक्षक भूमि अभिलेख संवर्गातील रिक्त पदे भरण्याकामी कार्यवाही प्रगतीत असून, सदरचे पद भरण्यास प्राधान्याने विचार करण्यात येईल.

---

**नागभीड (जि.चंद्रपुर) तालुक्यातील काही गावामध्ये बकऱ्यांवर टिप्स रोगाची लागण होऊन बकऱ्यांचा मृत्यू झाल्याबाबत**

**(४७) ६२५४४ (०१-०९-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागभीड (जि.चंद्रपुर) तालुक्यातील काही गावामध्ये बकऱ्यांवर टिप्स रोगाची लागण होऊन माहे एप्रिल, २०१६ रोजीच्या सुमारास नऊ बकऱ्यांचा मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) तसेच या रोगास आळा घालण्याकरिता शासनाने कोणती प्रतिबंधात्मक उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१९-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) (३) (४) नागभीड (जि. चंद्रपूर) येथे आतापर्यंत पीपीआर चे ४२८० लसमात्रा व ईटिव्हीचे २००० लसमात्रांचे लसीकरण झालेले असून जनावरांचे लसीकरण करणे हे विभागाचे नियमित कार्य आहे. तसेच नागभीड (जि.चंद्रुपर) तालुक्यातील काही गावामध्ये बकऱ्यांवर ट्रिप्स रोगाची लागण होऊन माहे एप्रिल, २०१६ रोजीच्या सुमारास नऊ बकऱ्यांवर ट्रिप्स वा अज्ञात रोगाची लागण होऊन मृत्यू झालेला नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## खासगी आणि शासकीय पशुवैद्यकीय संस्थातील सोनोग्राफी मशिनची आरोग्य अधिकाऱ्यांकडे नोंदणी करणे बंधनकारक असल्याबाबत

**(४८) ६२५९१ (१२-०८-२०१६). श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आरोग्य संस्था पाठोपाठ आता सर्व खासगी आणि शासकीय पशुवैद्यकीय संस्थातील सोनोग्राफी मशिनची पीसीएनडीटी कायद्यानुसार सक्षम आरोग्य अधिकाऱ्यांकडे नोंदणी करणे बंधनकारक करण्याचे आदेश कृषी व पशुसंवर्धन विभागाने दिले असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आदेशाची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१९-१०-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) पीसीपीएनडीटी अधिनियम १९९४ नुसार राज्यातील पशुवैद्यकीय संस्थांमधील सोनोग्राफी यंत्रांची नोंदणी करण्याकरीता शासनामार्फत देण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचना क्षेत्रीय स्तरावर परिपत्रित करण्यात आलेल्या आहेत.

राज्यातील एकूण १३२ राज्यस्तरीय पशुवैद्यकीय दवाखान्यांपैकी ३३ दवाखान्यांमधील सोनोग्राफी यंत्रे नोंदणीकृत असून उर्वरित ९९ दवाखान्यांमधील सोनोग्राफी यंत्रांच्या नोंदणीसाठी रु. २४,७५,०००/- एवढा निधी पुरवणी मागणीद्वारे अर्थसंकल्पित करण्यात आलेला असून त्यापैकी रु. १९,८०,०००/- एवढा निधी वितरीत करण्यात आलेला आहे, तसेच, जिल्हा परिषदे अंतर्गत असलेल्या एकूण ३३ पशुवैद्यकीय दवाखान्यांमधील सोनोग्राफी यंत्रांपैकी १४ सोनोग्राफी यंत्रांची नोंदणी झाली असून उर्वरित १९ अनोंदणीकृत सोनोग्राफी यंत्रांच्या नोंदणीसाठी जमा सेवाशुल्काचा निधी वापरण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दुग्ध व्यवसायातील जोखीम आणि वाढत्या उत्पादन खर्चाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारच्या पशुधन विमा योजनेबाबत

**(४९) ६२७११ (१२-०८-२०१६). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दुग्ध व्यवसायातील जोखीम आणि वाढत्या उत्पादन खर्चाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारच्या पशुधन विमा योजनेला इतर राज्यांमध्ये चांगला प्रतिसाद मिळत असून महाराष्ट्र मात्र या योजनेविषयी दुर्लक्ष करीत असल्याचे माहे मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र सरकारकडून सदर योजनेसाठी प्रसिध्दी आणि प्रचारासाठी निधी दिला जातो, परंतु संबंधित यंत्रणा पशुपालकांपर्यंत या योजनेची माहिती पोचवण्यात अपयशी ठरत असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने पशुधन विमा योजनेला प्रतिसाद,मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१९-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) योजनेच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे प्रसिध्दी व प्रचारासाठी संबंधित जिल्हयांना निधी उपलब्ध करून दिलेला असून सदर योजनेस व्यापक प्रसिध्दी देण्यात आलेली आहे. तसेच, मे.न्यु इंडिया एश्युरन्स कंपनीमार्फत सुध्दा योजनेची प्रचार व प्रसिध्दी केली जात आहे. दि.१५.०८.२०१६ पर्यंत राज्यातील एकूण १,२६,९१७ जनावरांचा विमा उतरविण्यात आलेला आहे. या योजनेंतर्गत पशुपाळकांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा यासाठी दि.०१.०८.२०१६ ते दि.१५.०८.२०१६ दरम्यान पशुधन विमा पंधरवडा साजरा करण्यात आला व त्यास पशुपालकांचा चांगला प्रतिसाद मिळालेला आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मराठवाड्यातील दुसरे आयुक्तालय स्थापण्यासंदर्भात

**(५०) ६३०३७ (१९-०८-२०१६). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाड्यातील दुसरे आयुक्तालय स्थापण्यासंदर्भात राज्य शासनाने नोंदलेल्या एक सदस्यी अभ्यासगटाचा अहवाल गतवर्षीच्या सप्टेंबर, २०१५ मध्ये शासनास प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नांदेड येथे दिनांक २३ फेब्रुवारी, २०१५ रोजी पर्यंत आयुक्तालय स्थापन करण्यात येत असतानाच राज्य शासनाने अचानक शुध्दिपत्रक प्रसिध्दी करुन आयुक्तालय कोठे असावे याबाबत आक्षेप व हरकती मागविण्यात आल्या, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने योग्य वेळी आयुक्तालय स्थापन करण्याचे जाहीर केल्याचे माहे मार्च, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने दुसरे आयुक्तालय सुरु करण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१९-१०-२०१६) :**(१), (२), (३), (४), (५) व (६) शासन निर्णय, महसूल व वन विभाग दिनांक १६.२.२०१५ अन्वये विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद चे विभाजन करुन नव्याने निर्माण करावयाच्या विभागीय आयुक्तालयात कोणत्या जिल्ह्यांचा समावेश करावा व नवीन विभागीय आयुक्तालयाचे मुख्यालय कोणत्या ठिकाणी असावे, या विषयी सखोल अभ्यास करुन तत्संबंधी शासनास शिफारशी करण्यासाठी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली एक-सदस्यीय अभ्यासगट गठीत करण्यात आला आहे. त्यानुसार एक सदस्यी अभ्यास गटाने दिनांक १५.९.२०१५ रोजी अहवाल सादर केला होता.

तथापि, सदर अहवालातील शिफारशी उक्त अभ्यासगटास अभ्यासार्थ संदर्भित केलेल्या विषयाशी सुसंगत नसल्याने प्रस्तावित नवीन विभागीय आयुक्त कार्यालयाचे मुख्यालय कोणत्या ठिकाणी ठेवावे याबाबत निश्चित अशी शिफारस गटास फेर अभ्यास करुन सुस्पष्ट शिफारशीसह शासनास अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.